| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ५२ वा | बुधवार दिनांक २९ एप्रिल, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649


# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग सतर्क

### उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन



धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ होत असून भारतीय हवामान खात्याने एप्रिल महिना तसेच मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तापमान आणखी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्हा आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली असून उष्माघात प्रतिबंधक आणि उपचारात्मक उपाययोजनांसाठी व्यापक तयारी करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी यांची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीत उष्माघातावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना,तातडीचे उपचार तसेच नागरिकांमध्ये आरोग्य जनजागृती करण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या.सर्व आरोग्य संस्थांना नागरिकांना योग्य उपचार उपलब्ध करून देतानाच उष्माघाताबाबत आवश्यक आरोग्य शिक्षण देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभाग,जिल्हा परिषद धाराशिव यांच्या माध्यमातून जिल्ह्यात व्यापक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.त्यानुसार जिल्ह्यातील ५ ग्रामीण रुग्णालये,६ उपजिल्हा रुग्णालये,४४ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये कोल्ड रूमची स्थापना करण्यात आली आहे.

उष्माघातावरील उपचारासाठी आवश्यक औषधसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच जिल्हास्तरावर विशेष टास्क फोर्स स्थापन करण्यात आली असून सर्व आरोग्य संस्थांना जनजागृतीसाठी प्रसिद्धी साहित्यही वितरित करण्यात आले आहे.

**उष्माघातापासून बचावासाठी आरोग्य विभागाच्या महत्त्वपूर्ण सूचना पुढीलप्रमाणे आहेत :**

**हे करा :**

पुरेसे पाणी प्या आणि प्रवासात पाणी सोबत ठेवा.हलक्या वजनाचे,फिकट रंगाचे आणि सैलसर कपडे वापरा.उन्हात जाताना गॉगल,छत्री,पादत्राणे वापरा. टोपी किंवा हॅटखाली ओलसर कपडा ठेवा. पाळीव प्राण्यांना सावलीत व थंड ठिकाणी ठेवा.ओलसर पडदे,पंखे,कुलर यांच्या साहाय्याने घर थंड ठेवा.

**हे करू नका :**

शक्यतो दुपारच्या उन्हात बाहेर जाणे टाळा.कष्टाची कामे उन्हात करू नका. पार्क केलेल्या वाहनात लहान मुलांना ठेवू नका. गडद रंगाचे किंवा तंग कपडे वापरू नका. उष्णतेच्या काळात स्वयंपाक करताना स्वयंपाकघर हवेशीर ठेवा,मद्य,चहा, कॉफी,सॉफ्ट ड्रिंक्स टाळा.अतिप्रथिनयुक्त किंवा शिळे अन्न सेवन करू नका.

**उष्माघाताची लक्षणे : प्रौढांमध्ये :**

शरीराचे तापमान १०४ फॅरनहाइट (४० अंश सेल्सिअस) पर्यंत वाढणे,तीव्र डोकेदुखी,स्नायू आखडणे मळमळ, उलटीची भावना,चक्कर येणे,हृदयाचे ठोके वाढणे घाबरणे किंवा चिंता वाटणे.

**लहान मुलांमध्ये :**

आहार घेण्यास नकार,चिडचिडेपणा, लघवीचे प्रमाण कमी होणे,डोळे शुष्क होणे,तोंडाची त्वचा कोरडी पडणे,रक्तस्त्राव होणे,शरीराचे तापमान वाढलेले, गोंधळलेली,बेशुद्ध,अत्याधिक घाम येणारी किंवा घाबरलेली व्यक्ती आढळल्यास तात्काळ टोल फ्री क्रमांक १०८ किंवा १०२ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी उष्णतेच्या लाटेकडे दुर्लक्ष करू नये,कारण उष्माघाताचे गंभीर परिणाम होऊ शकतात.आवश्यक ती खबरदारी घेऊन स्वतःचे आणि कुटुंबाचे संरक्षण करावे,असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी केले आहे.

## क्रीडाक्षेत्रात धाराशिवची झेप: शालेय स्पर्धा,आधुनिक क्रीडा संकुले आणि पायाभूत सुविधांच्या विकासातून जिल्ह्याला नवी ऊर्जा

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राने उल्लेखनीय प्रगतीची नोंद करत शालेय स्पर्धा,आधुनिक क्रीडा सुविधा आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या क्रीडा विकासाला नवी दिशा दिली आहे. सन २०२५-२६ या वर्षात जिल्हा क्रीडा परिषदेमार्फत तालुकास्तरावर १० खेळ,जिल्हास्तरावर ९३ खेळ आणि विभागस्तरावर १३ खेळांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सन २०२२-२३ पासून शालेय क्रीडा स्पर्धांची संपूर्ण कार्यपद्धती ऑनलाईन करण्यात आली असून प्रमाणपत्र वितरणही डिजिटल स्वरूपात केले जात आहे.

यावर्षी जिल्ह्यातील ६६६ शाळांमधील तब्बल ४४ हजार ३३५ खेळाडूंनी शालेय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून क्रीडाप्रती वाढती आवड सिद्ध केली आहे.दि.२३ ते २६ मार्च २०२६ या कालावधीत तालुका क्रीडा संकुल,कळंब येथे आयोजित राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेत राज्यातील ८ विभागांमधून ६२५ खेळाडूंनी सहभाग घेत जिल्ह्याच्या क्रीडा व्यवस्थापन क्षमतेची प्रचिती दिली.जिल्हा क्रीडा संकुल योजनेअंतर्गत श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम,धाराशिवसाठी १कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक व नॅचरल ग्रास फुटबॉल मैदान उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

जिल्हा नियोजन समितीमार्फत बॅडमिंटन हॉल अद्ययावतीकरणासाठी १५०.४९ लक्ष आणि वुडन फ्लोअरिंगसाठी १९५.१३ लक्ष निधी मंजूर करण्यात आला असून ही कामे वेगाने सुरू आहेत.जलतरण तलाव अद्ययावतीकरणाचाही प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.तालुका क्रीडा संकुल योजनेंतर्गत भूम,जेवळी, कळंब,तुळजापूर आणि गुंजोटी येथे बहुउद्देशीय इनडोअर हॉल,ट्रॅक, मैदान,प्रशासकीय इमारती,पायाभूत सुविधा आणि इतर विकासकामे प्रगतीपथावर आहेत.विविध तालुक्यांमध्ये मंजूर निधीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आधुनिक क्रीडा सुविधा उभारल्या जात असून ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार संधी उपलब्ध होत आहेत.

क्रीडा स्पर्धांबरोबरच जय शिवाजी पदयात्रा,आंतरराष्ट्रीय योग दिन, जागतिक ऑलिम्पिक डे,हर घर तिरंगा रॅली,राष्ट्रीय क्रीडा दिन,क्रीडा सप्ताह आणि जिल्हास्तरीय युवा महोत्सव अशा विविध उपक्रमांच्या आयोजनातून क्रीडा संस्कृतीला व्यापक सामाजिक स्वरूप प्राप्त झाले आहे.धाराशिव जिल्ह्यातील क्रीडा विभागाच्या या सर्वसमावेशक आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रमांमुळे जिल्हा केवळ स्पर्धात्मक क्रीडेतच नव्हे,तर सक्षम,आधुनिक आणि प्रेरणादायी क्रीडा विकासाच्या दिशेने प्रभावीपणे वाटचाल करत आहे.

## धाराशिव येथे पालकांसाठी ‘एका दिवसासाठी मूल बना’ उपक्रमाचे आयोजन



धाराशिव (शेख अंजुम)- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पालकांची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन पोदार प्रेपतर्फे एक आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.‘तुमच्या मुलासोबत शाळेत एक दिवस घालवा - एका दिवसासाठी मूल बना’ या उपक्रमाअंतर्गत पालकांना आपल्या मुलांसोबत शाळेत वेळ घालवण्याची संधी मिळाली.

या उपक्रमाद्वारे पालकांना शाळेतील दैनंदिन शैक्षणिक प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्कल टाइम, संवाद, गोष्टी, संगीत, हालचाली आणि खेळ यांच्या माध्यमातून मुलांचे शिक्षण कसे घडते, हे पालकांनी प्रत्यक्ष पाहून आणी त्यात सहभागीही होऊन अनुभव घेतला. तसेच अभ्यासक्रम मुलांमध्ये विचारशक्ती, सर्जनशीलता आणि सामाजिक कौशल्ये कशी विकसित करतो, याचीही माहिती मिळाली.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे पालकांना कृतीतून शिक्षण अनुभव देणे आणि दैनंदिन उपक्रमांमुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला कशी चालना मिळते, हे समजावून सांगणे हा होता.

हा उपक्रम पोदार प्रेप, धाराशिव येथे आयोजित करण्यात आला होता.

या उपक्रमाबद्दल मुख्य शैक्षणिक अधिकारी डॉ. स्वाती पोपट वत्स यांनी पालकांना सहभागाचे आवाहन केले होते.

## क्राईम न्युज

### दुकानातील कॉपर वायर चोरी करणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

धाराशिव (प्रतिनिधी)-दि २३.०४.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि अमोल मोरे व पथक हे माला विषयीचे गुन्हे उघडकीस आणणे अनुषंगाने पेट्रोलींग करत असताना पथकास बातमी मिळाली की, पोलीस ठाणे शिराढोण गुरनं १३/२०२६ कलम ३३४(१)३०५ मधील धनाजी रा. आळणी फाटा रेल्वेस्टेशन बाजूला ता.जि. धाराशिव, शिवाजी रा. अंदोरा ह.मु. कन्हेरवाडी पाटी ता. कळंब जि. धाराशिव यांनी मिळून केला असुन धनाजी हा सध्या चोरीचा माल विक्री करण्यासाठी वाशी फाटा येथे थांबलेला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन पथकाने नमुद ठिकाणी जावून धनाजी यास ताब्यात घेवून त्याचे कडे चोरीचे गुन्ह्याबाबात अधिक विश्वासात घेवून चौकशी केली असता त्यांने सागिंतले मी व शिवाजी यांनी सुमो क्र एमएच १४ सीएक्स२३७७ ने शिराढोण येथील दुकानातील २०० ते २५० किलो कॉपर वायर चोरी केली आहे. आरोपी नामे- धनाजी पवार याचे ताब्यातुन १७ किलो कॉपर वायर, टाटा सुमो जीप क्र एमएच १४ सीएक्स २३७७ असा एकुण ३,७०,४०० किंमतीचा मुददेमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक धाराशिव व मा. श्रीमती शफकत आमना, अपर पोलीस अधिक्षक धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री विनोद इज्जपवार, सपोनि अमोल मोरे, सचिन खटके, पोह अमोल चव्हाण, बळीराम शिंदे,अमोल निंबाळकर, राहुल नाईकवाडी, मपोहा/ शोभा बांगर, चालक पोअं/ विनायक दहिहंडे यांचे पथकाने केली आहे.

### तिन टायरी वहानाच्या चाकासह, बॅटरीची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- सोमनाथ विजय सुर्यवंशी, वय ३५ वर्षे, रा. तेरणा इंजिनीअरींग कॉलेज समोर तुळजापूर रोड धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे अॅपे रिक्षाचे तिन टायर चाके व्हीलसह, बॅटरी असा एकुण ११,००० किंमतीचे साहित्य हे दि. २६.०३.२०२६ रोजी २२.३० ते दि. २७.०४.२०२६ रोजी ०६.०० वा. पुर्वी तेरणा इंजिनीअरींग कॉलेज समोर तुहजापूर रोड, धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सोमनाथ सुर्यवंशी यांनी दि.२७.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

## माझं गाव,आरोग्य संपन्न गाव अभियान

### १ मे रोजी जिल्हास्तरीय पत्रकार कार्यशाळा

धाराशिव (जिमाका) राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने माझं गाव,आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानास मंजुरी दिली आहे.लोकसहभागावर आधारित ही राज्यव्यापी आरोग्य चळवळ मंत्रिमंडळ बैठकीत मान्य करण्यात आली असून १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत संपूर्ण राज्यभर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी धाराशिव येथे जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.ही कार्यशाळा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत दि.१ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० ते १० वाजेपर्यंत जिल्हा नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे संपन्न होणार आहे.ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी, लोकसहभागातून गावपातळीवर आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी तसेच आरोग्यविषयक जनजागृती वाढविण्यासाठी या अभियानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी या महत्त्वपूर्ण कार्यशाळेस उपस्थित राहून अभियानाची माहिती जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. श्री.हरिदास यांनी केले आहे. माझं गाव,आरोग्य संपन्न गाव ही मोहीम ग्रामीण आरोग्य क्षेत्रात नवा आदर्श निर्माण करणार असून निरोगी,सक्षम आणि स्वयंपूर्ण गावांच्या निर्मितीकडे राज्याचे मोठे पाऊल मानले जात आहे.

## आंदोरा ग्रामपंचायतीत आर्थिक घोटाळा? कागदोपत्री कामे, प्रत्यक्षात शून्य – जनतेचा संताप उफाळला!





**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-** कळंब तालुक्यातील आंदोरा ग्रामपंचायतीत गेल्या तीन वर्षांत विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक अपहार आणि भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणाने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. जनसेवक पीजी नाना तांबारे यांनी या कथित घोटाळ्याची पोलखोल करत थेट जिल्हा प्रशासनाकडे पुराव्यांसह लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, आंदोरा ग्रामपंचायतीतील सरपंच, ग्रामसेवक आणि संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी संगनमत करून अंदाजे एक कोटी रुपयांचा निधी अपहार केला असल्याचा संशय आहे. विशेष म्हणजे, अनेक विकासकामे कागदोपत्री पूर्ण दाखवून प्रत्यक्षात ती कामेच झाली नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

**काम नाही, पण बिले काढली!**

समाजकल्याण विभागाच्या दलितवस्ती सुधार योजनेतून २०२४ मध्ये मंजूर रोहीदास नगरमधील भुमिगत गटरलाईन व सिमेंट रस्ता ही कामे प्रत्यक्षात न करता आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्येच मार्च महिन्यात त्यांची बिले काढण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेल्या कामांबाबतही गंभीर अनियमितता आढळून आली आहे. कामे न करता पूर्ण दाखवून चइ (मोजमाप पुस्तिका) नोंद न करता नियम धाब्यावर बसवून पैसे उचलल्याचे स्पष्ट येतआहे.

**संशयास्पद व्यवहार**

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, बार्शी, कळंब आदिं फर्मच्या नावांवर दि. १८ मार्च २०२५ आणि ०४ ऑगस्ट २०२५ रोजी चेकद्वारे रक्कम काढण्यात आली, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**पुरावे दिल्यावर घाईघाईत काम सुरू**

तक्रार दाखल झाल्यानंतर, संबंधितांना माहिती मिळताच सरपंचांनी घाईघाईत प्रत्यक्ष साईटवर कोणतीही परवानगी न घेता आणि साईट इंजिनिअरच्या अनुपस्थितीत ओबडधोबड काम सुरू केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

तक्रारदारांनी दि. १ जानेवारी २०२३ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान झालेल्या सर्व कामांची टेक्निकल टीमसह सखोल चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमावी अशी मागणी केली आहे.

**प्रशासन काय करणार?**

आता या गंभीर प्रकरणात जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्याकडून कोणती ठोस कारवाई होते, संबंधितांवर का होत नाही. या प्रकरणी सखोल चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

## मोरवे यांना क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



सरचिटणीस संतोष भोजने

धाराशिव (प्रतिनिधी) - राष्ट्रीय ओबीसी, बहुजन शिक्षक संघाच्यावतीने देण्यात येणारा क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक खिजर मोरवे यांना जाहीर झाला आहे.

राष्ट्रीय ओबीसी, बहुजन शिक्षक संघाचे प्रदेश अध्यक्ष अनिल नाचपते व राज्य सरचिटणीस संतोष भोजने यांनी मोरवे यांच्या आजपर्यंत केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर केला आहे.

मोरवे हे तुळजापूर तालुक्यातील वडगाव (देव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्काराबद्दल मोरवे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## डॉल्बी सिस्टीमचा आवाज कर्णकर्कश ठेवून आदेशाचे उल्लंघन;गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत राहुल रा. फुरसुंगी ता. हवेली जि. पुणे यांनी दि. २६.०४.२०२६ रोज नळदुर्ग गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकी मध्ये लावलेले वाद्य हे पारंपारिक पध्दतीने किंवा पोलीसांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे न लावता मालक आयोजकांनी वाहनावर (टॉप व बस) डॉल्बी डिजे साउंड सिस्टीमचा आवाज ध्वनी तीव्रतेपेक्षा व कर्णकर्कश ठेवून आदेशाचे उल्लघंन केले. यावरुन पोलीसांनी नमूद व्यक्तींविरुध्द संबंधीत पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

